
# राजमाची

शार्दुल प्रमोद पाटील



# राजमाची

शार्दुल प्रमोद पाटील

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फोरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका

सकल महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज व महाराष्ट्राच्या इतिहासाला भूगोल मिळवून देणाऱ्या सह्याद्रीस अर्पण.

# मनोगत



गेली १० – १२ वर्षे ह्या सह्याद्रीच्या कुशीत बरीच भटकंती केली. काही कल्पित तर काही अकल्पित घटनांचा साक्षीदार झालो. शिवरायांच्या इतिहासाच्या साक्षीनं २५ - ३० गडकोट व बऱ्याच डोंगरवाटा तुडऊन झाल्या. काळपरत्वे ह्यातील बऱ्याच घटना विस्मृतीच्या पडद्याआड नाहीश्या झाल्या. मागे राहिल्या त्या फक्त त्यांच्या खुणा. आज पर्यंत केलेल्या भटकंती बद्दल कधी साधं चिटोरं सुध्दा लिहिल नाही. आठवणी वर्षान - वर्षे ताज्या रहाव्यात म्हणून आता लिहिण्याची गरज जाणवत आहे. त्यासाठी उचललेलं हे पहिलच पाऊल, केलेला पहिलाच प्रयत्न. पहिला प्रयत्न असल्यामूळे काही चूका झाल्या असतील तर मायबाप वाचकांनी त्या पोटात घ्याव्यात.

**ओळख** : शार्दुल प्रमोद पाटील

profshardulp.patil@gmail.com

(पहिलाच प्रयत्न असल्यामुळे सहित्यीक अशी कोणतीही ओळख नाही)

**पत्ता** :‘माधव कृपा’, दत्त कॉलनी, गहिनीनाथ नगर, कागल. ४१६२१६

**फोन** : ९१५८०४४००४

**राजधानी वसेल असा.... राजमाची**

पाठीवर सॅग लादावी, घरातून बाहेर पडाव, कोणतीतरी डोंगरवाट जवळ करावी, स्वच्छ हवा, बोचरी थंडी, निरभ्र आकाश, खडतर डोंगरवाटा, इतिहास संपन्न किल्ले, त्याची बांधणी, गाणारी पाखरे, बागडणारी फुलपाखरे ह्या सर्वांचा अनूभव घेत दोन तीन दिवस मनसोक्त हिंडावे व दोनचार



महिन्यांच्या व्यापात स्वत:ला गाडण्यासाठी परत फिरावे . ह्यासाठी दरवेळी पाठीवर सामान घेऊन घरातून बाहेर पडणारी आम्ही मित्रमंडळी. भटकंती मागील कुणाचा उद्देश काय असेल याचा काही नेम नाही. कुणाला नुसतेच चालायला आवडते, तर कुणाला किल्ले बघायला आवडते, कुणाला जंगल तर कुणाला डोंगरवाटा, कुणी पाखरे बघतो तर कुणी फुलपाखरे,कुणी निसर्ग डोळ्यात साठवतो तर कुणी कॅमेरात. असे वेगवेगळे इंटरेस्ट असणारे सात आठ अवलीये एकत्र येऊन आम्ही दरवेळी भटकंतीसाठी बाहेर पडतो. नितीन जाधव, तानाजी पाटील, अमर रजपूत, संदीप घाटगे, विक्रम चव्हाण, अमित खोत व मी असे सात जण ह्यावेळी ट्रेक ला जाण्याचे नक्की झाले. ह्या पैकीसंदिप व विक्रम चे येणे एनवेळी रद्द झाल्यामूळे आम्ही पाच लोक बाहेर पडलो.



गेल्या काही वर्षातील भटकंतीत कोल्हापूर जिल्हा व जवळील सर्व ट्रेक व किल्ले बघुन संपले. मागच्याच वर्षी दिवळी नंतर लोहगड – विसापूरगड व भाज्याची लेणी पाहून ठरवले होते की ह्यावर्षी लोणावळ्या जवळच्या राजमाची किल्ल्याचे दर्शन घ्यायचे. दरवर्षी दिवाळी नंतर लगेचच बाहेर पडणारे आम्ही ह्यावर्षी प्रत्येकाच्या सवडीचे नियोजन करत संक्रांत आली तरी घरीच होतो. शेवटी काहीही झाले तरी संक्रांत घरी करायची नाही हे ठरवून राजमाची व कोंढाणे लेणी बघण्याचे नियोजन करण्याचे ठरले.

प्रत्येक वेळी ट्रेकचे नियोजन करण्याचा बहुतांश भाग हा अमर रजपूत व माझ्याकडे असल्यामूळे आठ – दहा दिवस अगोदरच मित्रांना फोन करणे , इंटरनेट सर्च करणे, गडकिल्ले व लेण्यांची पूस्तके चाळणे सुरु झाले. राजमाची व कोंढाणे लेणी यांची माहिती मिळवताना जे काही मिळाले ते बरेच जूने व आउटडेटेड मिळाले. त्यात राजमाचीला जाणारे दोन ट्रेक रुट मिळाले. एक लोणावळा मार्गे तर दुसरा कर्जत मार्गे. लोणावळा मार्गे अंतर जास्त (अंदाजे १५ कि. मी.) पण चढण सोपी तर कर्जत मार्गे अंतर कमी (अंदाजे ८ कि. मी. ) पण चढण अवघड. सर्वानूमते असे ठरले की जाताना लोणावळा मार्गे जाऊन राजमाची बघावा व येताना कोंडाणे लेणी बघुन कर्जत मार्गे परत फिरावे. कोल्हापूर ते लोणावळा अंतर ३०० कि. मी. असल्याने आमचा जवळ जवळ एक दिवस प्रवासात खर्च होणार असल्याने आदल्या दिवशी रात्री निघण्याचे ठरले. त्याप्रमाणे आदल्या दिवशी रात्री १० वाजता कोल्हापूर- मुंबई गाडीने लोणावळ्यास उतरणे नक्की झाले.

निघायच्या दिवशी सकाळ पासूनच सामान बांधणे, बाजार करणे, जेवण साहित्य घेणे ह्या तयारीस सुरुवात झाली . सर्व तयारी आटोपुन सर्वजण रात्रीचे जेवण उरकून नऊ वाजता कोल्हापूर स्टँड वर एकत्र जमलो. कोल्हापूरहुन पुण्या, मुंबईला जाणा-या ब-याच खासगी गाड्या ह्या वेळेस उपलब्ध असतात. त्यापैकी पवन ट्रॅव्हल्सचे लोणावळ्या पर्यंतचे तिकीट काढुन गाडीत जाऊन विसावलो.

गाडी बरोबर १०:३० वाजता कोल्हापूर स्टँड वरुन सुटली. ट्रेकची उत्सुकता मनात असल्यामूळे झोप लागणे कठीणच होते. ट्रेकची गोळा केलेली माहिती वाचणे, रुटमॅप बघणे, किल्याचा इतिहास वाचणे , अंतर तपासणे, गुगल मॅप बघणे असे काही ना काही प्रत्येकाचे सुरु होते. कराड सोडल्यानंतर सर्वजण झोपेच्या अधीन गेले. खेड - शिवापूर टोल नाक्या जवळ गाडी काही वेळ विश्रांतीसाठी थांबली. त्यावेळी रात्रीचे साधारण दोन वाजले असावेत. गाडीतून उतरायचे नेमके ठिकाण आमच्या पैकी कुणालाच माहित नसल्यामूळे गाडीत परत बसताना गुगल वर रुट मॅप सेट करुन बसलो. लोणावळा बायपासवर पोहोचल्यावर गुगलने नोटीफाय केले. येथे गाडी थांबवुन पहाटे चार वाजता सर्वजण बायपास वर उतरलो. बायपास वर उतरणे आमच्या चांगलेच फायद्याचे ठरले. यामूळे आमचे चालण्यातले ३ – ४ कि. मी. वाचले.

सगळीकडे अंधार, अनोळखी रस्ता, व पत्ता सांगणारे कोणी नाही अशा वेळी पून्हा एकदा गुगल मॅप मदतीला धावून आले. राजमाची वर असणा-या उधेवाडी गावा पर्यंत मॅप सेट केला व चालायला सुरुवात केली. तुंगार्ली गावातील नारायणी धाम पासुन वळण घेऊन बायपास एक्सप्रेस हायवे पार केला व तुंगार्ली धरणाच्या चढा जवळ येऊन पोचलो. येथे आम्हाला सकाळी फिरायला जाणा-या तीन लोकांनी रस्ता बरोबर असल्याचे सांगितले. तुंगार्ली धरणाच्या भिंती जवळून पुढे जाताच आपण लोणावळ्यातील सर्वात उंच ठिकाणी पोहोचतो. येथुन मागे वळुन पाहता तुंगार्ली गाव व लोणावळा शहरातील रस्त्यावरच्या दिव्यांचा सुंदर नजारा नजरेस येतो.

पहाटेची हवा व पौर्णिमेच्या स्वच्छ चंद्रप्रकाश यामुळे चालणे फारच सुखकर वाटत होते. चंद्रप्रकाशात चालण्याची मजा काही औरच असते हे आम्हाला पुर्वीच्या अनुभवावरुन माहिती होते, तोच अनुभव पुन्हा येथे घेता आला.



लोणावळ्याहुन जवळ जवळ एक तास चालल्यावर आम्ही ठाकरवाडी ह्या जेमतेम १० ते १५ उंबरे असणा-या लहानश्या गावात येऊन पोहोचलो. लोणावळ्याहून येथपर्यंत पक्का रस्ता आहे. इथुन पुढे कच्चा रस्ता व जंगलाची वाट सुरु होते. मानवी हस्तक्षेपामुळे सध्या जंगल फक्त जंगल म्हणावे एवढेच शिल्लक आहे. इथुन पुढे काही अंतर चालल्यावर आपण एका मोकळ्या पठारावर पोचतो. अजुनही अंधार होताच पण चंद्रप्रकाशात समोर आकाशात उंच दिसणारे दोन सुळके आम्हाला खुणाऊ लागले. हे दोन सुळके म्हणजेच एक श्रीवर्धन व दुसरा मनरंजन हे राजमाचीला असणारे दोन बालेकिल्ले. अंधारात का असेना पण किल्ल्याचे दर्शन होताच एक वेगळाच उत्साह अंगात संचारला.

सकाळी ६:३० च्या दरम्यान सुर्यनारायणाने सर्वांनाआपल्या प्रकाशाच्या कवेत घ्यायला सुरुवात केली. आम्ही डोंगराच्या पश्चिम दिशेला असल्यामूळे सुर्यदर्शन होत नसले तरी उजेड दिसायला सुरुवात झाली. उंच डोंगर, खोल दरी, दरीच्या तळातून वाहत जाणारी उल्हास नदी, फार दाट नसले तरी शिल्लक असणारे जंगल, त्यातुन वाहत येणारा वा-याचा धिरगंभीर आवाज हे सर्वच सह्याद्रीच्या भव्य – दिव्यतेची जाणिव करुन देणारे होते.

जवळ जवळ दोन अडीच तास तेही मोकळ्या वातावरणात (प्रदूषण विरहीत) चालल्यामुळे आमच्या सारख्या खाद्य प्रेमी लोकांना भुक लागणे साहजिक होते. एका मोकळ्या जागी बसून, घरुन आणलेली न्याहारी करुन थोडी विश्रांती घेतली व पुन्हा चालायला सुरुवात केली.

खोल जाणारी दरी न्याहाळावी, गार गार वारा अंगावर घ्यावा, वा-याची शीळ ऐकावी, बागडणारी



फुलपाखरे व गाणारी पाखरे बघावीत, फुललेली रानफुले बघावीत, फोटो काढावेत, मध्येच कुणालातरी गाणे आठवावे व ते लगेच सगळ्यांनी म्हणावे हे वाटेत सुरुच होते. इतिहासा पासुन ते विज्ञाना पर्यंत व पर्यावरणा पासुन ते राजकारणा पर्यंत कोणत्याही विषयावर गप्पा मारत मजल –

दरमजल आमचा प्रवास सुरु होता. वाटेत लोणावळ्याकडे जाणारा एखाद दुसरा वाटसरु भेटत होता. त्यापाशी थांबुन दोन चार गुजगोष्टी करुन पुढे जाणे सुरु होते.

सकाळच्या थंड हवेत कितीही चालले तरी थकवा असा जाणवत नव्हता. साधारण १० च्या दरम्यान आम्ही फणसवाडी ह्या डोंगर कपारीतील गावाजवळ येऊन पोहोचलो. येथुन पुढे डोंगराला वळसा घातला की आलेच उधेवाडी.फणसवाडी पासुन काही अंतर चालल्यावर रत्याला दोन फाटे फुटतात. त्यापैकी उजव्या बाजुचा रस्ता वरंवंड कडे तर डाव्याबाजुचा रस्ता उधेवाडी कडे जातो. येथे दोन बरेच जुने व गंजलेले बोर्ड आहेत त्यावर फक्त उधेवाडी व वरवंड लिहीलेले आढळते. येथुन पुढे काही अंतर चालल्यावर आपण राजमाची किल्ल्याच्या वेशीत येऊन पोहोचतो.

किल्ल्याच्या वेशीजवळ अर्धवट तुटलेली तटबंदी, दरवाजाचे अवशेष, एक विरगळ, गणेश व मारुतीचे मंदिर बघायला मिळते. मंदिराला लागुनच गडावर जाण्यासाठी वाट आहे. ही वेस व गड पायथा ह्या दरम्यान २ कि. मी. अंतर आहे. ही वेस बघताना कोल्हापूर जिल्ह्यातील रांगणा किल्ल्याच्या उंब-याची आठवण येते. रांगण्याचा उंबरासुद्धा असाच गडा पासुन दोन ते अडीच कि. मी.जंगलात आहे. राजमाची किल्ल्याच्या माचीवर ३० – ४० घरांचे उधेवाडी हे गाव वसलेले आहे. येथुन पुढे काही अंतर चालल्यावर आपण उधेवाडी गावात पोहोचतो.



उधेवाडी गावाच्या अलिकडेच वनविभाग व ग्रामपंचायतीने चौकी बसविली आहे. येथे येणा-या प्रवाशाकडुन कर स्वरुपात १० रु घेतले जातात. त्या पैशातुन किल्ल्यावर ठिक ठीकाणी माहिति फलक लावणे,गडाची काळजी घेणे, साफसफाई करणे, काही डागडूजी करणे अशी कामे केली जातात. चौकीत असणारा पहारेकरी किल्ल्याची माहिति देण्याचे व कर गोळा करण्याचे काम करतो. ह्या गोळा होण-या करातुनच गडमाचीवर असणारे उधेवाडी गाव, गडावर जाणारी वाट, गडावर असणारे अवशेष याची छान काळजी घेतली आहे. राजमाची रुरल डेव्हलमेंट प्रोग्राम ह्या गो. निं. दांच्या ह्या उपक्रमाद्वारे गड किल्ल्यांची काळजी कशी घ्यावी ह्याचे एक उत्तम उदाहरण उधेवाडीच्या गावक-यांनी घालुन दिले आहे. पहारेक-या कडुन किल्ल्याची व किल्ल्याच्या विकासकामा विषयी काहीवेळ गप्पामारुन गड बघायला सुरुवात केली.



राजमाची किल्ल्याच्या माचीवर उधेवाडी हे गाव वसलेले आहे. ह्याच गावातुन गडाच्या दोन्ही बाले किल्ल्यांवर जाण्यास वाट आहे. किल्ल्याच्या दोन

बालेकिल्ल्यांपैकी जो उंचीने लहान आहे तो मनरंजन व जो उंच आहे तो श्रीवर्धन. उधेवाडी गावातुन दोन्ही बालेकिल्यांच्या मध्ये असणा-या पठारावर जाण्यास पाय-यांची वाट आहे. ह्या वाटेवर डाव्या बाजुला गुहेत स्वच्छ पाण्याची टाकी आहे. येथे पाणी भरुन आम्ही किल्यावर जाण्यास सुरुवात केली. येथुन पाचच मिनिटांत आपण दोन्ही बालेकिल्ल्यांच्या मध्ये असणा-या मोकळ्या जागेत पोचतो व इथेच पाय-यां चा रस्ता संपतो.

मनरंजन व श्रीवर्धन च्या मध्ये एक सखलपट्टीआहे. ह्या सखलपट्टी वर भैरवनाथाचे एक मंदिर आहे. मंदिराच्या दारात तीन चार दिपमाळ , लक्ष्मीची मुर्ती व घोड्याचे एक शिल्प आहे. मंदिराच्या बाहेर झाडाच्या सावलीत बसुन आम्ही सर्वांनी घरुन आणलेला शीधा सोडला व त्यावर यथेच्छ ताव मारुन थोडावेळ विश्रांती घेतली. शनिवार – रविवारअसल्यामुळे गडावर पुण्या – मुंबईच्या मूलामुलींच्या ग्रुपची बरीच वर्दळ होती. ह्या इंटरनेटच्या काळात ही मुले एवढ्या आडवाटेला येऊन ह्या इतिहासात रमतात हे बघुन समाधान वाटले.

गावक-यांशी गप्पा मारताना आम्हाला समजले की किल्ल्यावर मुक्कामासाठी श्रीवर्धन बालेकिल्ल्यावर दोन गुहा आहेत. श्रीवर्धनवर मुक्काम करायचा असल्यामुळे आम्ही पहिल्यांदा मनरंजन बघुन मग श्रीवर्धन कडे जावे असे ठरले. भैरवनाथ मंदिरा समोर दोन लिंबुसरबताच्या व इतर सामानाच्या टप-या आहेत. त्यापैकी एका टपरीतील आजोबांची परवानगी घेऊन आम्ही आमच्या सामानाच्या बॅगा ठेवल्या व मनरंजन चढायला सुरुवात केली.



मनरंजन हा उंचीने कमी व सोपी चढण असल्यामुळे व पाठीवर सामान नसल्यामुळे जेमतेम १५ ते २० मिनिटांत आपण मनरंजनच्या प्रवेशद्वारात पोहोचतो. खणखणीत तटबंदी व आक्रमक दुर्गबांधणीचा प्रत्यय देणारं गोमुखी पध्दतीची बांधणी असणारं प्रवेशद्वार आपणास येथे पहावयास मिळते. ह्या प्रवेशद्वाराची हालत सध्या केविलवाणी म्हणावी अशीच आहे. प्रवेशद्वारा तुन वर गेल्यावर डाव्या हाताला आपण एका बुरुजावर पोहोचतो. येथुन आपल्याला उधेवाडी गाव व आजुबाजुचा परिसर न्याहाळता येतो. येथुन वर गेल्यावर आपल्याला पाण्याची दोन टाकी बघावयास मिळतात.

ह्या टाक्यांजवळ पोहोचताच आम्हाला हरणटोळ जातीच्या सापाच दर्शन झाल. मानव प्राण्याच्या



अस्तित्वाची जाणीव होताच हा धरतीपुत्र गडबडीने एका झुडुपात नाहीसा झाला. ह्या पैकी एका टाक्यात आम्हाला टाक्यात वाढलेल्या गवतात पाण्यावर मस्त मजेत पोहणारा घोणस नजरेत आला. बेडकाच्या मागावर बहुदा हा पाण्यात उतरला असावा. पाण्यावर मस्त मजेत पोहणा-या ह्या भितीदायक सापाचे छान पैकी फोटोसेशन करुन आम्ही त्याला त्याच्या विश्वात तसेच सोडुन पुढे गड बघण्यास प्रस्थान केले.

टाक्यावरुन पुढे गडमाथ्यावर आपणास मजबुत बांधणीची पण छप्पर नसणारी इमारत पहावयास मिळते. ही इमारत बहुदा एखादे मंदिर असावे असे वाटते सध्या आत कोणतीच मुर्तीअथवा काहीही अस्तित्वात नाही. इमारतीच्या चौकटीवर कोरलेल्या गजाननाच व कमळाच एक शिल्प पहावयास मिळतं. ह्या इमारतीच्या बाजुलाच किल्लेदाराच्या वाड्याचे व सदरेचे अवशेष आढळतात. ह्या अवशेषात सध्या फक्त वाड्याचे जोतेच अस्तीत्वात आहेत. ह्या जोत्यां वरुनच अंदाज बांधता येतो की हे बांधकाम वाड्याचे वा सदरेचे असावे.



ह्या वाडया वरुन पुढे जाताच थोडयाशा खालच्या बाजुला आपणास आणखी दोन पण आकाराने मोठी पाण्याची टाकी पहावयास मिळतात. ह्यापैकी एका टाक्यात उतरण्यासाठी दगडी पाय-या अस्तित्वात आहेत तर दुस-या टाक्यातील पाणी वाहुन जाऊ नये म्हणुन चांगलं ३ फुट रुंदीचे दगडी बांधकाम पहावयास मिळते. ह्या टाक्यांच्या परीसरात ३ – ४ महादेवाच्या पिंडी, डोके नसलेल्या एका नंदिबैलाचे शिल्प व दगडात कोरलेली एक मुर्ती पहावयास मिळते.



येथुन पुढे जाताच आपण किल्ल्याच्या पश्चिमेकडील टोकावर येउन पोहोचतो. येथुन आपल्याला नागफणी टोक, बोरघाट, ढाकचा बहिरी, उल्हास नदिचे खोरे असा बराच प्रदेश नजरेत येतो. इथुनच पुढे मनरंजनचा प्रवास संपवुन आपण श्रीवर्धन कडे जाण्यास परत फिरतो. गडमाथा तसा आटोपशीर असल्याने गडफेरी फारतर तास –दिडतासातच आवरते.

मनरंजनचे उर्वरीत दुर्गवैभव बघुन आम्ही परत भैरवनाथ मंदिरा समोरील आजोबांच्या टपरीत पोहोचलो. टपरीत आल्यावर आजींच्या हातचा गरमा गरम चहा घेउन आजोबांशी छान गप्पा झाल्या. आजोबांकडून श्रीवर्धनची मिळेल ती माहिती घेउन आम्ही आमचे सामान पाठीवर लादले व श्रीवर्धन सर करण्यास सुरुवात केली.

राजमाचीच्या बालेकिल्ल्यां पैकी सर्वांत उंच ९१० मिटर असा बालेकिल्ला म्हणजे श्रीवर्धन. श्रीवर्धनवर जाण्यासाठी दोन वाटा आढळतात. त्यापैकी एक गडाच्या मुख्य प्रवेशद्वार व देवडीतुन जाते तर दुसरीगडाच्या तुटलेल्या तटबंदीतुन जाते. देवडीतुन पुढे गेल्यावर काही अंतरावरच गुहा व पाण्याची टाकं असल्यामूळे व हेच आमचे वस्तीचे ठिकाण असल्याने आम्ही तुटलेल्या तटबंदीतून गडमाथ्यावर येउन पोहोचलो.



श्रीवर्धनची तटबंदी व बुरुज आजही ब-यापैकी सुस्थितीत आपल्याला पहावयास मिळतात. बुरुज व तटबंदीच्या अवशेषा वरुन किल्ल्याला ब-याच ठिकाणी दुहेरी तटबंदी असावी असे लक्षात येते. तटबंदीतुन वर पोहचताच समोरच दुहेरी तटबंदी असणारा बुरुज नजरेस येतो. ह्या बुरुजात दोन दरवाजे असल्यामुळे आपल्याला तटबंदी व बुरुज ह्यांच्या मध्ये असलेल्या मोकळ्या जागेत जाता येते. दुर्ग बांधणीचा उत्कृष्ठ नमुना म्हणून आपण हे अवशेष पाहु शकतो. येथुन वर जाताना ध्वजस्तंभ असणा-या बुरुजाच्या पायथ्याला चार – पाच पाण्याची टाकं आढळतात.ह्या पैकी सर्वात कडेच्या टाक्यात डोंगरातुन पाझरुन साठणारं स्वच्छ व मधुर पाणी मिळत . ह्या टाक्यांपैकी एका टाक्याजवळ लहानशी तोफ पडलेली आढळते. येथुन पुढे जाताच आपण ध्वजस्तंभाच्या बुरुजाजवळ येतो. हा बुरुज श्रीवर्धन वरील सर्वांत उंच ठिकाण आहे. ह्या बुरुजावरुन आपल्याला श्रीवर्धनचा सर्व परिसर, मनरंजन व आजुबाजुचा परिसर न्याहाळता येतो.



ध्वजस्तंभाच्या बुरुजाच्या समोरच आपल्याला आणखी एक दुहेरी तटबंदी असणारा बुरुज नजरेस येतो. दूर्दैवाने गडावर अस्तित्वात असलेल्या कोणत्याही बुरुजाचे वा दरवाज्याचे नाव आढळत नाही. हाही बुरुज आधीच्या

बुरुजासारखा दुहेरी तटबंदी असणारा व त्यापेक्षा काहीसा प्रशस्त आहे. ह्या बुरुजा जवळची तटबंदी अजुनही भक्कम असलेली लक्षात येते. तटबंदी वरुन पुढे गेल्यास एक पाण्याचे टाकं आढळते.

ध्वज स्तंभाच्या पायवाटेने परत फिरल्यावर आपण डोंगरात असणा-या गुहेजवळ येउन पोहोचतो. ही गुहा म्हणजे पुर्वी दारुगोळ्याचे कोठार असावे. गुहेत ३० फुट लांबी रुंदीचे ३ वेगवेगळ्या खोल्या आहेत. ह्या खोल्यांच्या बाहेर व्हरांडा आढळतो. गुहा अगदी स्वच्छ व प्रशस्त आहेत. ही गुहा म्हणजेच आमचे वस्तीचे ठिकाण असल्याने आम्ही सर्वांनी पाठीवरील सामान उतरुन विश्रांती घेतली.गुहेपासुन अगदी १०० फुटांच्या अंतरावरच दोन पाण्याची टाकं आहेत ह्यातील पाणी आम्ही जेवणास व अंघोळीस वापरले. गुहेच्या बाहेर सामान ठेउन आम्ही जळण गोळाकरुन गुहेची साफसफाई करुन घेतली. साफसफाई झाल्यावर टाक्यांवर जावून आंघोळी उरकल्या व जेवणासाठी पाणी घेउन गुहेवर परतलो.



गडावर शिजवलेल्या जेवणाची मजाच काही निराळी असते.दिवसभर चालुन केलेले परिश्रम व गडावरची मोकळी हवा ह्यामुळे इथले पिठले भात सुध्दा पंच पक्वान्ना पेक्षा रुचकर लागते.

गुहेच्या कोप-यात छानशी छोटेखानी चुल रचुन त्यावर सर्वांना पुरेल एवढा पुलाव व चरचरीत कोल्हापुरी पातळ पिठले तयार करुन त्यावर सर्वांनी मनसोक्त ताव मारला. पौर्णिमा असल्यामुळे चंद्रप्रकाशात गडावर एक फेरफटका मारावा असे मनात होते पण दिवसभराच्या पायपिटीमुळे आमच्यातील काही जण लगेच झोपी गेले. आम्ही एक छोटीशी शेकोटी करुन ह्यापुर्वी केलेल्या ट्रेकच्या आठवणी उजळत बराच वेळ गप्पा मारत बसलो व थोड्या वेळाने शेकोटी विझवुन झोपेच्या अधीन झालो.

सकाळी लवकर उठुन सर्व सोपस्कर उरकुन घेतले. रविवार असल्यामुळे पहाटे पासुनच श्रीवर्धन पहायला येणा-या लोकांची वर्दळ सुरु झाली. सकाळच्या न्याहारीसाठी रव्याचा उपमा करुन खाल्ला व गुहेची साफसफाई करुन सामान पाठीवर बांधुन दुस-या दिवसाच्या सफरीसाठी आम्ही तयार झालो. श्रीवर्धनचा उरलेला भाग, उधेवडी गावाजवळ असणारा उदयसागर तलाव व त्यासमोरील महादेव मंदिर बघुन राजमाचीच्याच डोंगरात असणारी कोंडाणे लेणी बघुन कोंडीवडे गावात पोहचावे व तेथुन कर्जत गाठावे असे नियोजन करुन चालायला सुरुवात केली.



श्रीवर्धनच्या प्रवेशद्वारा नजीक असणारा व ठळकपणे लक्षात राहणारा गडाचा भाग म्हणजे येथे असणारी देवडी. वळणा – वळणाचा मार्ग, दोन्ही बाजुला असणारी

तटबंदी व त्यात असणारे जोते व दगडी खांब हे गडाच्या गतवैभवाची जाणीवच करुन देत होते. कालओघाने व किल्ल्यांबद्दल आपल्याला असलेल्या अनास्थेने सध्या येथे फक्त काही अवशेषच आपल्याला पहायला मिळतात. देवडीचे गतवैभव मनात साठवुन, श्रीवर्धनचे मोडकळीस आलेले प्रवेशद्वार बघितले व श्रीवर्धन उतरायला सुरुवात केली.

येथुन काही वेळातच आपण उधेवाडी गावात येउन पोहोचतो. उधेवाडी गावच्या राईपलीकडे एक मोठा तलाव नजरेस येतो तो उदयसागर तलाव. उधेवाडी गावातील लोकांनी तलावापर्यंत जाण्यास दगडी



वाट करुन घेतली आहे. सन १७१२ मध्ये दंडाराजापूरीच्या कोण्या देशमुखान हा तलाव बांधला अशी माहिती मिळते. तलावाच्या आजुबाजुचा परिसर फारच सुंदर व निसर्गरम्य आहे. तलावाच्या बाजुलाच एक सुंदर व बैठे जुने महादेवाचे मंदिर अहे. मंदिराच्या दाराबाहेर नंदी, गोमुख कुंड व एक दिपमाळ आपल्याला पाहता येते. गावक-यांनी तलाव व मंदिर परिसर फारच स्वच्छ व सुंदर ठेवला आहे.

किल्लापरिसर, तलाव, मंदिर, बालेकिल्ले ह्यांच्या जपणुकीचा व संरक्षणाचा जो वसा गावक-यांनी घेतला आहे त्यांच्या ह्या कार्यास कोटी कोटी शुभेच्छा देउन आम्ही कोंढाणे लेण्यांच्या दिशेने आमचा प्रवास चालु केला. सकाळची थंड हवा व डोंगर उताराचा रस्ता असल्यामुळे पायपीट थोडी सुखकर वाटत होती. साधारण तीन एक तासांच्या पायपीटी नंतर आम्ही कोंढाणे लेण्यांजवळ पोहोचलो. कोंडीवडे गावाच्या अलीकडे साधारण ३०० ते ४०० फुट डोंगरात कोंढाणे लेणी आहेत.



राजमाची किल्ल्याच्या उत्तरेकडील कडयाच्यापोटात कोंढाणे लेणी आहेत. सह्याद्रीच्या कवेत असलेल्या ह्या लेण्यांचा परिसर वृक्षवेलींनीवेढलेला आहे. येथुन आपल्याला बरोबर समोर खंडळ्याचा घाट, रेल्वे लाईन व तळात उल्हासनदिचे खोरे नजरेत येते.

कोढाणे लेणीही हिनयान पंथीयांची लेणी असुन इसवी सन पुर्व दुस-या शतकात ती खोदण्यात आली असावीत. कोंडाण्याला एकुण आठ चैत्य व विहार आहेत. येथील चैत्य वा भाजाचे चैत्य यात बरेच साम्य आढळते. चैत्याच्या दर्शनी भागाची सजावट फारच सुंदर आहे. मुख्य वास्तुचे छत हे गजपृष्ठा सारखे असुन, कमान पिंपळपानाच्या आकाराची आहे. स्तुपा समोर प्रशस्त सभागृह असुन भाज्या

प्रमाणे येथेही भिंतीलगत अष्टकोनी स्तंभ आहेत. भाज्या प्रमाणेच येथे ही छताच्या बाजुला लाकडी जाळी बसवलेली असावी असे वाटते. लेण्याच्या दर्शनी कमानीवर दोन्ही बाजुला सुंदर कोरीव काम करण्यात आलेले आहे. दर्शनी भागाच्या मध्यावर कमानीच्या दोन्ही बाजुला सात शिल्प चौकटी आहेत. या शिल्प चौकटीत युगलांची व नर्तकांची अतिशय सुंदर शिल्पे कोरण्यात आलेलीआहेत.




चैत्यालगत थोडया वरच्या भागात विहार आहे. ह्या विहाराच्याआतील भिंतींच्या भागात आठरा कक्ष आहेत. ह्या कक्षात खोदिव बाक आहेत. ह्या विहाराच्या छतावर लाकडी बांधकामा प्रमाणे सपाट तुळ्या व त्यांना छेदणा-या पट्ट्या फारच सुंदर आहेत. ह्या विहारच्या एका भिंतीवर कोनाडयात स्तुपाचे प्रमाणबध्द व रेखीव शिल्प कोरलेले आहे. कालओघाने ही दोन व शेवटचे एक लेणे वगळता इतर सर्व लेणी नष्ट झाली आहेत. इतर लेण्यांच्या फक्त खोबणीच शिल्लक आहेत. शेवटचे लेणे हे बहुदा भिक्षुंचे भोजनगृह असावे असे वाटते.

येथील शिल्पकला, कोरीव काम व शांतता आपल्याला एका वेगळ्याच विश्वात घेउन जाते. तंत्रज्ञान कितीही पूढे गेले तरी पूरातन लोकांच्या तुलनेत आपण किती कसपटा समान आहोत ह्याची जाणीव हे सर्व पाहताना झाल्या शिवाय राहत नाही. तासा भरात हे सर्व शिल्पवैभव नजरेत साठवुन आम्हीसर्वांनी कोंढाणे गावाच्या दिशेने प्रस्थान केले.



कोंढाणे गावात पोहोचल्यावर उल्हास नदिच्या पात्रात सर्वांनी मनसोक्त डुंबुन दोन दिवसांच्या पायी प्रवासाचा थकवा घालवला. येथेच सोबत आणलेले जेवण जेउन कोंडीवडे गावातुन कर्जतकडे जाण्यास गाडी पकडली. दोन दिवसांच्या प्रवासाच्या सुखद आठवणी मनात साठवुन परत आपापल्या कामावर रुजु होण्यास सज्ज झालो.



## ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईल मध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या! तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com